# सानिया यांच्या कादंबऱ्यामधील स्त्रीसंवेदना

**प्रा. डॉ. लता पांडुरंग मोरे**
प्रमुख, मराठी विभाग
राजर्षी शाहू कला व वाणिज्य
महाविद्यालय, रुकडी

१९९० नंतरच्या काळावर जागतिकीकरणाचा प्रभाव ठळकपणे दिसतो आहे. या काळात स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत. या काळातील स्त्री विचारी आहे, काळानुसार बदलत आहे, प्रत्येक क्षेत्रात कार्यरत राहून आपली मते, विचार, समाजासमोर मांडत आहे. या स्त्रीत्वाचे भान ठेवत कादंबरी या वाङ.मय प्रकारांत सुनिता कुलकर्णी - बलरामन म्हणजेच सानिया यांनी लेखन केले आहे. त्यांनी कथालेखानाद्वारे मराठी साहित्यविश्वात प्रवेश केला. सध्या त्या मराठीतील आघाडीच्या कथा, कादंबरीकार म्हणून प्रसिध्द आहेत. देश-परदेशात वावरताना त्यांना जे जाणवले तसेच त्यांनी स्वत: जे अनुभवले ते त्यांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहे. या निबंधामध्ये त्यांच्या ‘स्थलांतर’, ‘अवकाश’ आणि ‘आवर्तन’ या तीन कादंबऱ्यातील स्त्रीसंवेदनांविषयी संशोधन केले आहे. या अभ्यासासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

‘स्थलांतर’ ही सानिया यांची पहिली कादंबरी नंदिता आणि जगदीश यांच्या निवेदनातून आकाराला आली आहे. या कादंबरीमध्ये पत्रात्मक निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. जगदीश आणि नंदिता यांनी एकमेकांना लिहिलेली पत्रे या कादंबरीत आली आहेत. नंदिता ही सावित्री आणि मनोहर यांची मुलगी असून या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. लहानपणापासून हट्टी आणि खेळकर असणारी नंदिता अभ्यासात हुशार नाही. तिला मित्र-मैत्रिणींमध्ये रमायला आवडते. आई - वडिलांपेक्षा सावत्रमामा जगदीशवर ती अधिक प्रेम करते. वाढत्या वयाबरोबर नंदितामध्ये समंजसपणा येण्या ऐवजी तिच्यातील बिनधास्तपणात वाढ होते. यातूनच शंतनू नावाच्या श्रीमंत घरच्या मुलाच्या ती प्रेमात पडते.

स्वत:च्या मनाप्रमाणे हवे तसे जगणारी नंदिता शंतनूशी विवाह केल्यानंतर पूर्णपणे बदलली. तिच्यातला खेळकर, हसरा व बिनधास्तपणा जाऊन सासरच्या शिस्तप्रिय वातावरणामुळे गंभीर बनली. यातच भर म्हणजे शंतनूच्या मारहाण करून लैंगिक सुख मिळविण्याच्या विकृत स्वभावाला ती कंटाळली. एखाद्या फुलपाखराप्रमाणे स्वच्छंदी जीवन जगणारी नंदिता शंतनूच्या दाहक आणि विक्षिप्त वागण्यामुळे जीवनातील हास्य हरवून बसली. आपण घेतलेल्या लग्नाच्या चुकीच्या निर्णयाचा धक्का आणि भविष्यातील कोणत्याही सकारात्मक शक्यतांचा आशावादी विचार नको वाटल्यामुळे तिने आत्महत्येचे पाऊल उचलले. पण त्यात ती अपयशी ठरली.

नंदिताची मनस्थिती ठीक झाल्यानंतर जगदीशमामाच्या सल्ल्याप्रमाणे तिने MBA चे शिक्षण घेऊन रिना आणि विश्वंभर या मित्रांच्या मदतीने ती एका जाहिरात कंपनीत नोकरी करू लागली. शंतनूच्या दाहक अनुभवामुळे जीवनातील हास्य हरवलेल्या नंदिताला पुर्नविवाहाची भीती वाटते. त्यामुळे विश्वंभरसारखा सद्गुणी मुलगा लग्नाची मागणी घालतो, तेव्हा पहिल्या लग्नामुळे आई-वडील, मामा यांना दु:खी केल्याच्या पश्चातापामुळे विश्वंभरला नकार देते. तेव्हा तिला समजावताना विश्वंभर म्हणतो, “ सतत अपराधी वाटून घ्यायचं व्रत घेतलं आहेस का? होतात चुका असंख्यवेळा माणसाच्या हातून म्हणून काय आपण तिथेच अडून राहतो?’ ( स्थलांतर, पृष्ठ १२९) विश्वंभरच्या या उद्गारातून आश्वासक आधार व्यक्त होतो. शेवटी नंदिताचे वडील या विवाहासाठी पुढाकार घेतात आणि त्यांचा विवाह होतो.

या कादंबरीमध्ये नंदिताच्या संदर्भात अनेक स्थलांतरे आली आहेत. तिचे पहिले स्थलांतर लग्नानंतर झाले. या स्थलांतरात तिच्या केवळ स्थानात बदल झाला

नाही तर तिच्या स्वभावाचेही स्थलांतर झाले. हसती-खेळती नंदिता गंभीर बनली. शंतनूशी घेतलेल्या घटस्फोटामुळे ती पुन्हा मामाकडे स्थलांतरित झाली. त्यापुढे शिक्षणासाठी हॉस्टेल आणि पुढे विश्वंभर सोबत परदेशात स्थलांतरित झाली. नंदिताच्या या स्थलांतराची कथा सानिया यांनी तिच्या व्यक्तिमत्वातील अनेक कंगोऱ्यासह सांगितली आहे.

'स्थलांतर' मधील दुसरी स्त्री व्यक्तिरेखा आहे सावित्री. ती अत्यंत हुशार आणि शिक्षणाची आवड असणारी; पण हट्टी स्वभावाच्या वडिलांनी तिचे शिक्षण अर्ध्या वाटेवर असताना मनोहर नावाच्या क्लार्कशी विवाह करून दिला. यावेळी भविष्य अंधारमय वाटलेल्या सावित्रीला सावत्रभाऊ जगदीश आधार देतो. तिचे प्रबोधन करून पुढच्या शिक्षणासाठी चालना देतो. जगदिशच्या मदतीमुळे शिक्षण पूर्ण करून ती प्राध्यापिका बनते.

सावित्रीच्या जीवनात अनेक अडचणी आल्या पण त्या तिने शांतपणे सोडविल्या. लग्नानंतर लगेचच इच्छा नसताना तिला बाळाला जन्म द्यावा लागला. सुरुवातीला तिने या बाळावर म्हणजेच नंदितावर मनापासून प्रेम केले नाही. पण ती मोठी झाल्यानंतर मात्र आईपेक्षा मैत्रिणीचे नाते दृढ केले. मुलीची कुचंबणा होऊ नये म्हणून तिला व्यक्तीस्वातंत्र्य दिले.

सावित्रीच्या घरची परिस्थिती बेताची होती. पण तरीही तिने तिच्याकडे मदतीसाठी येणाऱ्यांना सढळ हाताने मदत केली. या परोपकारी स्वभावामुळे ती काही वेळा अडचणीतही आली. अध्यापनाची आवड असणारी सावित्री विद्यार्थ्यांमध्ये प्रिय होती. त्यामुळे कॅन्सरमधून ती लवकर बरी व्हावी म्हणून विद्यार्थी प्रार्थना करतात. सावित्रीचा सोशिक आणि समजूतदार स्वभाव तिच्या आजारपणात प्रकर्षाने जाणवतो. कॅंसरसारख्या गंभीर आजारात शांतपणे इलाज करून घेत ती घरच्यांना धीर देते. पण या आजाराशी लढा देताना तिचा मृत्यू होतो. या कादंबरीतील तिची व्यक्तिरेखा मवाळ स्त्रीवादी विचारांची दिसते.

सानिया यांची 'आवर्तन' ही दुसरी कादंबरी. यामध्ये सुरुची आणि इला या दोन प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहेत. यापैकी सुरुची म्हणजे कमला आणि प्रदीप यांची मोठी मुलगी. त्या दोघांचे वास्तव्य अमेरिकेत तर सुरूची भारतात आजी नयनतारा यांच्याकडे मोठी झाली. नयनतारा म्हणजेच नीनी. कडक शिस्तीच्या मुख्याध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

या कादंबरीतील सुरुची परंपरागत स्त्रीप्रमाणे नटणारी, मुरडणारी नाही. तिला मेकअप, दागदागिने आवडत नाहीत. मानेवर कसेबसे बांधलेले केस, सुटलेल्या बटा, जाडसर ढगळ शर्ट, विटकी जीन्स आणि धुळीने भरलेले कॅनव्हास शूज असा तिचा नेहमीचा पेहराव होता. थोडक्यात ती साध्या राहणीची पण आधुनिक विचारांची होती.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती विद्यापीठाच्या लायब्ररीत नोकरीला लागते. तिथे तिची इला या मैत्रिणीशी ओळख होते. इला वकील असून स्त्रियांच्या प्रश्नांसाठी लढते. त्यामुळे सुरुचीला ती अधिक जवळची वाटते. इलामुळेच सुरुचीची श्रीरंग या तरुणाशी भेट होते. तो साहित्यप्रेमी असून एजन्सी चालविणारा बड्या बापाचा मुलगा आहे. त्याच्या वडिलांनी त्याला जबरदस्तीने अमेरिकेत पाठवून बिझनेस मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण करून स्वतःच्या धंद्यात घातले. गोड बोलण्यातून इतरांना मंत्रमुग्ध करणाऱ्या श्रीरंगच्या प्रेमात सुरुची पडते. इला व श्रीरंग यांच्या सहवासात आल्यामुळे सुरूचीचा स्वभाव अधिक बंडखोर बनला. त्यामुळेच आपल्या मित्रांवर ताशेरे ओढणाऱ्या निनीला सुरुची सांगते, " मी आता स्वतंत्र आहे; काहीही करू शकते, कशीही राहू शकते. मी काय घालावे, माझे मित्र-मैत्रिणी कोण असावेत, हे मी ठरवणार." (आवर्तन पृष्ठ २३) या उद्गारातून सूरुचीचा बंडखोर आणि स्पष्टवक्ता स्वभाव लक्षात येतो.

श्रीरंग व इला यांच्या सहवासात आल्यानंतर सुरुची अनेक गोष्टींचा गंभीरपणे विचार करायला शिकते. समाजातील स्त्रीजीवन, स्त्री-पुरुष संबंध, विवाह परंपरा, इत्यादी विषयी खूप चिंतन करते. या चिंतनातून तिला परंपरागत लग्न पद्धती चुकीची आहे, स्त्री-पुरुषांना बंधनात ठेवणारी आहे असे लक्षात येते. श्रीरंगच्या आधुनिक विचारसरणीमुळे लग्न न करता त्याच्यासोबत एकत्र राहू लागते. कडक शिस्तीच्या निनीला हे पटत नाही. त्यामुळे नीनी खूप मोठे वादळ उठविते. पण सुरुची आपल्या विचारांवर ठाम राहते. श्रीरंगच्या अपघाती मृत्यूमुळे ती काही काळ उद्ध्वस्त होते पण नंतर स्वतःला सावरुन घेऊन एकटीने जगण्याचा निर्णय घेते.

या कादंबरीतील इला व्यवसायाने वकील असून स्त्रीवादी विचारांची आहे. विलक्षण बुद्धिमान आणि कर्तबगार असणाऱ्या इलाने स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपले जीवन पणाला लावले. ती स्वतंत्र विचाराची असल्यामुळे तिचे नवऱ्याशी पटत नाही. त्यामुळे घटस्फोट घेऊन ती स्त्रीचळवळीत कार्य करते.

सानिया यांची 'अवकाश' ही तिसरी कादंबरी. या कादंबरीची नायिका जान्हवी एका मध्यमवर्गीय, परंपरानिष्ठ तमीळ कुटुंबात जन्मलेली आहे. ती रुपाने सुंदर, हुशार आणि संवेदनशील तरुणी असून आई -वडील व भाऊ श्रीनिवास यांच्यासोबत मुंबईत राहत असते. पण श्रीनिवासच्या अपघाती मृत्यूमुळे तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न विरून जाते. मुलगा म्हणजे सर्वस्व मानणारे आई-वडील आपल्या दु:खातून बाहेर न आल्यामुळे जान्हवीच्या आयुष्याची फरफट होते.

श्रीनिवासच्या मृत्यूनंतर जान्हवीचे कुटुंब मद्रासला पेरीपा यांच्या आश्रयाला येते. मेडिकलला जाऊ इच्छिणाऱ्या जान्हवीला तिथे बीएससीचे शिक्षण घ्यावे लागते. एकुलत्या मुलाच्या मृत्यूमुळे जगणे बंद केलेल्या जान्हवीच्या आईवडिलांनी तिच्या लग्नाची तयारी सुरू केली. तेव्हा "मला नाही असं कुणाशी तरी लग्न करायचं. शिकायचं आहे मला." (अवकाश, पृष्ठ २२) असे म्हणणाऱ्या जान्हवीला समजून घेतले जात नाही. भारतीय पुरुषप्रधान परंपरेतील राघवनशी तिचा विवाह होतो. गरीबी आणि आडमुठ्या नवऱ्याशी जुळवून घेत जान्हवी विक्रम आणि कार्तिक या दोन मुलांची आई होते. एकूणच जान्हवीचे आयुष्य म्हणजे दु:खाची कहाणी होते. जान्हवीच्या जीवनात गायत्री व सदाशिवन यांच्या आगमनामुळे थोडा आनंद येतो.

या कादंबरीतील दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे गायत्री. परदेशात काही वर्षे वास्तव्य केल्यामुळे ती स्त्री-पुरुष समतेचा विचार करते. ती अपत्यहीन असली तरी तिला आपल्या संसारात काही उणीव राहिली आहे असे वाटत नाही. समाजासाठी आपण काही केले पाहिजे हा गायत्रीचा विचार होता. या विचारांना सदाशिवनने नेहमी पाठिंबा दिला. गायत्री जान्हवीच्या मुलावर प्रेम करते. त्यांना लागेल ती मदत करते आणि त्यांचे भविष्य घडवते. गायत्रीने जान्हवीच्या मुलांना आपली मुले मानून त्यांचे भविष्य घडविले. जान्हवीच्या मुलांनी गायत्रीला आपल्या आईच्या स्थानी मानले. त्यामुळेच गायत्रीच्या मृत्यूनंतर एकट्या पडलेल्या सदशिवनशी आईने लग्न करावे हा हट्ट धरला. त्यामुळे मुलांच्या व सदाशिवन यांच्या प्रेमापोटी जान्हवीने सदाशिवनशी पुनर्विवाह केला. या विवाहाच्या निमित्ताने जान्हवीचे एका नव्या अवकाशात आगमन झाले.

या कादंबरीतील जान्हवी सामर्थ्यवान असूनही तिने आयुष्यभर अन्याय सहन केला. परंपरावादी आईला नकार देणारी, मुलगी म्हणून दुय्यम दर्जाची वागणूक देणाऱ्या आपल्या कुटुंबाचा निषेध करणारी, राघवनच्या पत्नी म्हणून दुय्यम वागणूक देणाऱ्या विचारांचा निषेध करते. पण मनात खदखदणारा हा निषेध प्रत्यक्ष कृतीत तिने कधीच आणला नाही. त्यामुळेच या कादंबरीतील जान्हवी अन्याय सहन करणारी, नशीब जसे फिरवील तशी फिरणारी, परंपरावादी विचारांची, सामान्य स्त्री वाटते. तर या कादंबरीतील गायत्री पाश्चात्त्य देशातील वास्तव्यामुळे स्वतंत्र विचारांची, स्त्री-पुरुष समानता मानणारी स्त्रीवादी विचारांची आहे.

सानिया यांच्या तीनही कादंबऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर खालील निष्कर्ष हाती आले.

**निष्कर्ष :-**

१) सानिया यांच्या कादंबऱ्या नायिकाप्रधान आहेत.
२) सानिया यांनी स्त्रीवादी भूमिकेतून लेखन न करता स्त्री एक माणूस आहे म्हणून लेखन केले आहे.
३) सानिया यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा काळाला अनुसरून बदलत्या जीवनप्रणालीस अनुसरून जगतात.
४) सानिया यांनी त्याच्या कादंबऱ्यामध्ये सजग होत जाणाऱ्या स्त्री मनाचा शोध घेतला आहे.
५) सानिया यांनी आपल्या कादंबऱ्यामध्ये स्त्रियांच्या सुप्त क्षमतांचा, सामर्थ्यांचा वेध घेतला आहे.
६)सानियांच्या कादंबऱ्यांमध्ये आधुनिक स्त्रीच्या सुखदु:खांच्या जाणिवांचा वेध घेतला आहे
७) सानियांनी कादंबऱ्यांमध्ये स्त्री-पुरुष संबंधातील अनेक पदरी सहसंबंधांचा शोध घेतला आहे.
८)सानिया यांच्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखा सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या, स्वत:च्या अस्तित्वाचे भान असणाऱ्या, स्वत:विषयी सजग होत जाणाऱ्या आहेत.
९) सानिया यांची लेखनशैली काहीशी त्रोटक व संदिग्ध आहे.

१०) सानिया यांचे लेखन जिवंत व्यक्तिचित्रे, काव्यात्म भाषा तसेच जीवन विषयक प्रगल्भ दृष्टिकोन यामुळे वेगळी उंची गाठणारे आहे.

**संदर्भ:-**

१) सानिया, 'स्थलांतर', मौज प्रकाशन, मुंबई, १९९४.
२) सानिया, 'आवर्तन', मौज प्रकाशन, मुंबई, १९९६.
३) सानिया, 'अवकाश', मौज प्रकाशन, मुंबई, २००१.
४) खांडगे मंदा व इतर संपादक, 'स्त्री साहित्याचा मागोवा, खंड १,२ व ३, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, २००२.
५) भिरूड प्रमिला, ' मराठी कादंबरी: स्त्रियांचे योगदान', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००३.
६) गणोरकर प्रभा, डहाके वसंत आबाजी आणि अन्य संपादक, 'संक्षिप्त मराठी विश्वकोश', (१९२०-२००३), मुंबई, २००४.
७) राजाध्यक्ष विजया, (संपादक), 'मराठी कादंबरी आस्वाद यात्रा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००८.